# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## उच्च शिक्षणाच्या विकासासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज - माजी कुलगुरु डॉ. हरिभाऊ केदार
## प्रथम कुलगुरु डॉ.के.जी. देशमुख व्याख्यानमाला संपन्न

अमरावती. -

पूर्वी गुरुकुल पद्धतीने शिक्षण मिळायचे. नालंदा, तक्षशिला विद्यापीठांमध्ये परदेशीय विद्यार्थी शिक्षण घ्यायला यायचे. पाश्चिमात्य संस्कृती पौराणिक संस्कृतीपेक्षा उच्च दाखविण्यासाठी ब्रिटीशांनी भारतीय शिक्षण पद्धतीत प्रचंड बदल केले. मानव व विद्यार्थीकेंद्रीत शिक्षण पद्धती असायला हवी. केवळ परीक्षाकेंद्रीत शिक्षण पद्धती विद्यापीठांमध्ये दिसते. उच्चशिक्षण क्षेत्रात अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी समृद्ध, सक्षम, सर्वज्ञानी विद्यार्थी घडण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. हरिभाऊ केदार यांनी केले.

प्रथम कुलगुरु डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला स्वातंत्र सैनिक श्री कन्हैयालालजी रामचंद्र इन्नानी महाविद्यालय, कारंजा (लाड), जि. वाशिम या ठिकाणी संपन्न झाली. ‘उच्चशिक्षण आणि आव्हाने’ या विषयावर व्याख्यानमालेचे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, दानदाते डॉ.श्रीमती कमलताई देशमुख, विद्याभारती शैक्षणिक प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोक चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. राजपूत, पुरुषोत्तमजी इखार, सौ. इखार, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

‘उच्चशिक्षण आणि आव्हाने’ विषयावर मांडणी करतांना डॉ. केदार म्हणाले, अमेरिका आणि चीन नंतर इतकी मोठी शिक्षणप्रणाली भारताशिवाय इतर देशात नाही. पूर्वी चौसष्ठ कलांचा विकास करणारी शिक्षणपद्धती होती. प्रामाणिक संस्कृती व सामाजिक मन या देशात होते. ब्रिटीशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर येथील पौराणिक शिक्षणपद्धत बदलविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी १८५७ साली मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे विद्यापीठांची स्थापना केली.

भारताला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झालीत. स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी विद्यापीठांची संख्या वीस व महाविद्यालयांची संख्या ४९६ होती. आज ८६४ विद्यापीठे व ४०,००० महाविद्यालये या देशात आहेत, असे असले तरी १२५ कोटी जनतेसाठी ते पुरेसे आहे काय, असा प्रश्न त्यांनी मांडला. जागतिक विद्यापीठांशी तुलना करण्याचा प्रयत्न होतोय, परंतु येथील विद्यापीठांच्या स्थितीचा विचार आधी व्हायला हवा. भारतात जीईआर सध्या २५.२ % आहे, तर चीनमध्ये ४४ %, अमेरिकेत ८५ % आहे. भारताचा २५.२ % असलेला जीईआर ३० % पर्यंत नेण्याचा केंद्रशासनाचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

उच्चशिक्षणात भारत आजही मागे आहे. त्यासाठी कमकुवत आर्थिक स्थिती, जीडीपीच्या ६% ऐवजी ३.७ % खर्च, प्रशासकीय दिरंगाई, प्राध्यापकांमध्ये अधिक क्षमता व समर्पणाचा अभाव, केवळ नोकरीतील बढतीसाठी पीएच.डी., कालबाह्य अभ्यासक्रम, परीक्षाकेंद्रीत विद्यापीठाची प्रणाली, उच्चशिक्षण संस्थांमधील समन्वयाचा अभाव आदी घटक जबाबदार आहेत. विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती दिवसेंदिवस कमी होतांना दिसते, त्यासाठी प्राध्यापकांनी आपला विषय रोचक करावा, असे आवाहन त्यांनी केले. दर दहा वर्षांनी ज्ञान दुप्पट होते. कौशल्य विकास, मूल्य विकास हे एक आव्हान आहे. शिक्षकांचे ज्ञान विद्यार्थ्यांसाठी कमी पडत आहे. मुक्त विद्यापीठांची निर्मीती महत्वाची झाली आहे. मानवी विकासाचे महत्वपूर्ण नियमन विद्यापीठांद्वारे होत असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावर थिंगटॅक असावा, आणि विद्यार्थ्यांनी स्वतःशीच स्पर्धा करावी, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, उच्चशिक्षणामध्ये अनेक आव्हाने आहेत. आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांकडे प्रवेश घेण्यासाठी सुद्धा पैसे नसतात. विद्यार्थ्यांसाठी आणि विशेषतः ग्रामीण भागातील मुलींसाठी विद्यापीठाने अनेक उपयुक्त योजना सुरु केल्या आहेत. मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढावे, हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. जागतिक रॅंकींगमध्ये असलेली विद्यापीठे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देतय काय असा प्रश्न उपस्थित करुन कुलगुरुंनी पुढे सांगितले की, खुप योजना आहेत, त्यासाठी शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी आपला माईंडसेट बदलायला हवा. विद्यार्थ्यांना कौशल्य द्या, संशोधनासाठी प्रोत्साहित करा आणि त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवा, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गाडगे बाबा व प्रथम कुलगुरु डॉ.के.जी. देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचा शॉल, श्रीफळ व ग्रामगीता देवून प्राचार्य डॉ.पी.आर. राजपूत यांनी महाविद्यालयाच्यावतीने सत्कार केला व स्वागतपर भाषण करुन पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दर्पण वार्षिकांक, श्री इखार लिखीत पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. माजी प्र-कुलगुरु डॉ.व्ही.एस. जामोदे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. संचालन करीत आभार डॉ. अनुप नांदगांवकर यांनी मानले. राष्ट्रगीताने व्याख्यान कार्यक्रमाची सांगता झाली. व्याख्यानाला डॉ. केदार, महाविद्यालय व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, प्रतिष्ठीत नागरिक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्यापूर्वी कुलगुरुंचे हस्ते डॉ.व्ही.एस. जामोदे यांनी महाविद्यालयाला दिलेल्या पुस्तकदालनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालय परिसरात कुलगुरुंचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विविध विभागांची पाहणी करुन विद्यार्थ्यांशी कुलगुरुंनी संवाद साधला व महाविद्यालयाच्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्राचार्य डॉ.पी.आर. राजपूत व सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३०/०८/२०१८.

दै............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी